# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** धुळे  **P.S.(ठाणे):** साक्री
   **FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0122  **Year (वर्ष):** 2026
   **Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):** 30/04/2026 22:38

2.

| **S.No. (अ.क्र.)** | **Acts (अधिनियम)** | **Sections (कलम)** |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
   1. **Day(दिवस):** गुरूवार  **Date From (दिंनाक पासून):** 30/04/2026
      **Time Period (कालावधी):** पहर 5  **Date To ( दिंनाक पर्यंत):** 30/04/2026
      **Time From (वेळेपासून):** 12:48 बजे
      **Time To (वेळेपर्यंत):** 14:04 बजे

   (b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
   **Date (दिंनाक ):** 30/04/2026  **Time (वेळ):** 22:09 बजे

   (c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
   **Entry No. (नोंद क्र.):** 027
   **Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 30/04/2026 22:19 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
   1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
   पूर्व, 1 किमी  **Beat No. (बिट क्र.):**
   (b) **Address (पत्ता):** साक्री पंचयात समिती कार्यालय, महात्मा गांधी रोजगार हमी शाखेत,साक्री

   (c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
   **Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
   **District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): सचिन शालीकराव साळुंखे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1986

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पाेलीस उप अधीक्षक, लाप्रविध ,साक्री ,धुळे,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | पाेलीस उप अधीक्षक, लाप्रविध ,लाप्रविधुळे ,साक्री ,धुळे,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9834202955

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | नितीन नारायण वारकर | | | 1. बाहुबली नगर, प्लट नं 52, साक ध,धुळे,साक्री ,धुळे, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रुपये दराचे 20 चलनी नाेटा एकुण 10,000/रुपये | 10,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

10,000.00

**11. Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिंयाद साक्री पोलीस स्टेशन
दि.30.04.2026

मी सचिन शालीकराव साळुंखे, वय 40 वर्षे, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबधक विभाग, धुळे समक्ष पोलीस स्टेशनला हजर राहुन फिंयाद देतो की, मी लाचलुचपत प्रतिबधक विभाग, धुळे येथे पोलीस उप अधीक्षक या पदावर सुमारे दिड वर्षापासुन कार्यरत आहे. दि.30.04.2026 रोजी आम्ही दैनंदिन कर्तव्यावर हजर असतांना तक्रारदार मनोहर सुरेश देवरे यांनी कार्यालयात येवुन त्यांच्याकडे तांत्रिक सहायक नितीन वारकर हे लाचेची मागणी करीत असल्याचे सांगितल्याने आम्ही मा. जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, धुळे यांना पत्र देवुन त्यांचेकडील श्री श्रीकांत सुरेश राउत, लघुटंकलेखक व श्री हेमंत वासुदेव मराठे, कनिष्ठ लिपीक यांना पंच म्हणुन उपलब्ध करुन घेतले. तेव्हा आम्ही त्यांना आमची ओळख देवुन त्यांची ओळख करुन घेतली. तसेच कार्यालयात हजर असलेले तक्रारदार मनोहर सुरेश देवरे, पोकॉ. मकरंद पाटील, पोकॉ. रामदास बारेला यांची ओळख करुन दिली.

त्यानंतर आम्ही तक्रारदारास त्यांचे नांव गांव विचारता त्यांनी त्यांचे नांव मनोहर सुरेश देवरे, वय 47 वर्षे, व्यवसाय शेती, रा. ककानी, ता. साक्री, जि. धुळे, असे सांगुन त्यांनी त्यांचे तक्रारीची तोंडी हकीगत सांगितली, त्यानंतर तक्रारदार यांच्या सांगण्याप्रमाणे त्यांची तक्रार टंकलिखित करुन घेण्यात आली ती ''माझा भाऊ नामे किशोर सुरेश देवरे यांस मो ौजे ककानी, ता. साक्री येथील गट नं. 164/3 या शेतजमीनीमध्ये महाराष्ट्र शासनाच्या महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजने अंतर्गत सन 2023 - 24 यावर्षात विहिर खोदण्यासाठी 4 लाख रुपये मंजुर होवुन विहिरीचे काम सुरु करण्याकरीता गटविकास अधिकारी, साक्री यांनी दि.08.11.2023 रोजी कार्यारंभ आदेश दिला होता. त्याप्रमाणे माझया भावाने विहिरीचे काम सुरु केले असुन विहिरीच्या झालेल्या कामाप्रमाणे वेळोवेळी अनुदानाचे एकुण पंधरा हप्ते माझया भावास मिळाले आहेत. सदर अनुदान मिळणेकरीता मी माझया भावाच्या वतीने पंचायत समिती कार्यालयात जावुन पाठपुरावा करीत होतो. त्यानंतर उर्वरीत अनुदान मिळणेकामी तांत्रिक सहायक श्री नितीन वारकर यांनी दि.16.02.2026 रोजी विहिरीचे मोजमाप करुन मोजमाप पुस्तिकेमध्ये नोंद केली होती. सदर कामाचे अनुदानाबाबत मी साक्री पंचायत समिती कार्यालयात जावुन वेळोवेळी तांत्रिक सहायक नितीन वारकर यांची भेट घेत होतो. त्यानंतर सुमारे 4/5 दिवसापुर्वी मी तांत्रिक सहायक नितीन वारकर यांची साक्री पंचायत समिती कार्यालयात भेट घेवुन त्यांना माझया भावाच्या विहिरीच्या अनुदानाबाबत विचारणा केली असता त्यांनी ''मी तुझया भावाच्या विहिरीचे फेब्रुवारी 2026 मध्येच मोजमाप करुन झालेल्या कामाचे 1,62,320/- रुपयाचे मुल्यांकन मोजमाप पुस्तिकेत नोंदविले आहे. ती मोजमाप पुस्तिका तपासणीकरीता शाखा अभियता यांचेकडे पाठविण्यासाठी मला 15,000/- रुपये द्यावे लागतील, त्याशिवाय मी मोजमाप पुस्तिका पुढे पाठविणार नाही,'' असे मला सांगितले आहे. तेव्हा मी त्यांना आता माझयाकडे तेवढे पैसे नाहीत, पैसे जमा झाल्यावर भेटण्यास येतो'' असे सांगुन लाच मागणी केल्याची लेखी तक्रार दिली. सदर तक्रार वाचुन तक्रारी अर्जावर ंआम्ही व दोन्ही पंचांनी सहया केल्या आहेत.

त्यानंतर आम्ही तक्रारदार व पंचांशी चर्चा करुन साक्री येथे जावुन तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीची पडताळणी करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर आम्ही, दोन्ही पंच, पोकॉ. मकरंद पाटील व पोकॉ. रामदास बारेला असे शासकिय वाहन क्रमांक एम.एच.18 बीएक्स 0221 ने चापोहेकॉ. सुधीर मोरे यांचेसह तसेच तक्रारदार हे त्यांची मोटार सायकल क्र. एम.एच.18 टी 7353 ने ला.प्र.वि. धुळे कार्यालयातुन रवाना होवुन साक्री शहराचे बाहेर सुरत बायपास रस्त्यावर पोहोचलो. तेथे आम्ही तक्रारदार व दोन्ही पंचांना पडताळणी कार्यवाहीबाबत सविस्तर सुचना दिल्या. त्यानंतर आमचे सुचनेवरुन पोकॉ. रामदास बारेला यांनी डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन तक्रारदार यांच्याकडे देवुन तक्रारदार व पंच नं. 01 श्रीकांत राउत अशांना तक्रारदार यांच्या मोटार सायकलने नितीन वारकर

यांची भेट घेण्यासाठी साक्री पंचायत समिती कार्यालयात रवाना केले. त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच नं. 01 राउत असे आमचे जवळ परत आले. तेव्हा पंच नं. 01 राउत यांना विचारणा केली असता त्यांनी ''मी व तक्रारदार असे आपल्या पासुन तक्रारदार यांच्या मोटार सायकलने रवाना होवुन साक्री पंचायत समिती कार्यालयात गेलो. तेथे तक्रारदार यांनी मला समोर कार्यालयात उभे असलेल्या इसमाकडे इशारा करुन ते नितीन वारकर असल्याचे सांगितले. तेव्हा तक्रारदार यांनी नितीन वारकर यांची भेट घेतली. तेव्हा त्यांच्यात तक्रारदार यांच्या भावाच्या विहिरीच्या प्रकरणाबाबत चर्चा झाली. तेव्हा तांत्रिक सहायक नितीन वारकर यांनी तक्रारदार यांना मोजमाप पुस्तिका चव्हाण भाऊसाहेब (शाखा अभियंता) यांच्याकडे पाठविण्यासाठी 15,000/- रुपये लाचेची मागणी केली. तेव्हा तक्रारदार यांनी 15,000/- रुपये जास्त होतात असे सांगुन 10,000/- रुपये देतो असे सांगितले असता त्यांनी 10,000/- रुपये लाच स्विकारण्याचे मान्य केले. तेव्हा तक्रारदार यांनी बँकेतुन पैसे घेवुन येतो असे सांगितले. त्यानंतर तांत्रिक सहायक नितीन वारकर यांनी तक्रारदार यांना बँक पासबुक, आधार कार्ड, शेताच्या उताऱ्याची झेरॉक्स घेवुन येण्यास सांगितले. त्यानंतर आम्ही आपणाकडे परत आलो'' अशी हकिगत सांगितली. तसेच तक्रारदार यांनी देखील पंच नं. 01 राउत यांचे सांगणेप्रमाणेच हकिगत सांगितली. सदरची हकिगत व डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर मधील ध्वनीमुद्रित झालेले संभाषण ए◌ेकुन आमची व पंचांची तांत्रिक सहायक नितीन वारकर यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी केल्याची खात्री झाली.

त्यानंतर आम्ही तांत्रिक सहायक नितीन वारकर यांचेवर सापळा लावण्याचा निंणय घेतला. तेव्हा तक्रारदार यांनी सापळा कारवाईकामी त्यांच्याकडे उपलब्ध असलेले 10,000/- रुपये त्यात 500/- रुपये दराच्या 20 नोटा काढुन सदर चलनीय नोटांना पावडर लावुन सापळापुर्व कार्यवाही करुन लाचेची रक्कम तक्रारदार यांच्या पॅन्टच्या उजव्या खिशात ठेवली. तसेच तक्रारदार यांना बँक पासबुक, आधार कार्ड, शेताच्या उताऱ्याची झेरॉक्स प्रती त्यांच्या पॅन्टच्या डाव्या खिशात ठेवुन दिले. त्यानंतर आम्ही तक्रारदार व पंचांना सापळा कारवाईबाबत सुचना देवुन तक्रारदार यांच्याकडे डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन देवुन तक्रारदार व पंच नं. 01 श्रीकांत राउत अशांना तक्रारदार यांच्याकडील दुचाकीने साक्री पंचायत समिती कार्यालयात रवाना केले. त्यांचे पाठोपाठ आम्ही, पंच नं. 2 हेमंत मराठे, पोकॉ. रामदास बारेला, पोकॉ. मकरंद पाटील, चापोहेकॉ. सुधीर मोरे यांचेसह शासकिय वाहनाने जावुन साक्री पंचायत समिती कार्यालयाचे परिसरात वाहन थांबवुन आजुबाजुस सापळा लावला. काही वेळाने तक्रारदार यांनी कार्यालयाचे बाहेर येवुन ठरवुन दिलेला इशारा केला. तेव्हा सापळा पथक त्यांचेजवळ पोहोचलो. तेव्हा पोकॉ. रामदास बारेला यांनी तक्रारदार यांचेकडील डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर काढुन बंद केले. त्यानंतर आम्ही पंच नं. 1 यांना विचारणा केली. तेव्हा पंच नं. 1 यांनी कार्यालयात समोरच उभे असलेल्या इसमाकडे इशारा करुन ते नितीन वारकर असल्याचे सांगितले. तक्रारदार यांनी नितीन वारकर यांची भेट घेवुन त्यांच्याकडील कागदपत्रे त्यांना दिली, त्यानंतर त्यांनी हाताने पैशांबाबत इशारा केला. तेव्हा तक्रारदार यांनी त्यांच्या पॅन्टच्या उजव्या खिशातील लाचेची रक्कम काढुन त्यांच्या समोर धरुन 10,000/- रुपये असल्याचे सांगितले, तेव्हा नितीन वारकर यांनी ती त्यांच्या डाव्या हाताने स्विकारुन त्यांच्या पॅन्टच्या पुढील डाव्या खिशात ठेवल्याची हकिगत सांगितली. त्यानंतर आमचे सुचनेवरुन पोकॉ. मकरंद पाटील यांनी नितीन वारकर यांना त्यांचे मनगटापासुन हात धरुन त्यांना अटकावुन ठेवले. तेव्हा पंच नं. 02 यांचेकरवी नितीन वारकर यांचेकडुन लाचेची रक्कम हस्तगत करण्यात आली. तेव्हा कार्यालयातील रोजगार हमी कक्षात तांत्रिक सहायक नितीन वारकर, तक्रारदार व पंच नं. 02 यांच्या हातावर ऍ◌न्थ्रा◌ासिन पावडरची अल्ट्राव्हायलेट दिव्याची तपासणी केली. तसेच तांत्रिक सहायक नितीन वारकर यांचेकडुन हस्तगत केलेल्या नोटांची देखील तपासणी करण्यात आली. त्यानंतर तक्रारदार यांच्या तक्रारीवरुन झालेल्या संपुर्ण कार्यवाहीचा ला.प्र.वि. धुळे कार्यालयात जावुन सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

अशा प्रकारे तक्रारदार मनोहर सुरेश देवरे यांच्या भावाच्या विहिरीच्या कामाचे मुल्यांकन केलेली मोजमाप पुस्तिका तपासणीकरीता शाखा अभियंता यांच्याकडे पाठविण्यासाठी लोकसेवक नितीन नारायण वारकर, वय 52 वर्षे, तांत्रिक सहायक (बाहयास्त्रोत), पंचायत समिती, साक्री, रा. प्लॉट नं. 52, बाहुबली नगर, साक्री रोड, धुळे यांनी तक्रारदार यांच्याकडे 15,000/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती 10,000/- रुपये लाच स्विकारण्याचे मान्य करुन आज दि.30.04.2026 रोजी सापळा कारवाई दरम्यान साक्री पंचायत समिती कार्यालयाचे रोजगार हमी योजनेच्या शाखेत 14:04 वाजता 10,000/- रुपये लाचेची रक्कम स्वत: स्विकारुन त्यांनी स्वत:चे आर्थिक फायद्यासाठी भ्रष्ट व बेकायदेशिर मार्गाचा अवलंब करून अनाधिकाराने पदाचा दुरूपयोग केला म्हणुन त्यांचेविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे कलम 7 प्रमाणे माझी कायदेशिर फिर्याद आहे.

समक्ष                    ही फिर्याद दिली

दि.30.04.2026

( सचिन साळुंखे )
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, धुळे

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** **(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation:** **(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

dipak ramesh valavi(I (Inspector)) / pi **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S.**
**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

पोलीस ठाणे अमलदार
साक्री पोलीस ठाणे, जि.धुळे

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** dipak ramesh valavi
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** pi

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)